**नियमित दिवाणी दावा क्र.७३/२०२५**
रविंद्र वानखेडे व इतर
–वि.–
महादु कंकाळ व इतर

## अर्ज निशाणी क्र.५ वरील आदेश

वादींच्या विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकण्यात आला. दाव्यासोबत दाखल कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले. न्यायालयासमोर दाखल कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या नावे एकुण १ हेक्टर २० आर जमीन नसतांना दिनांक १०/०५/२०२३ रोजीच्या दस्त क्र.२५६३ अन्वये १ हेक्टर ६० आर जमीनीचे खरेदीदस्त प्रतिवादी क्र.६ समाधान जयराम वानखेडे याच्या नावे करुन दिली आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, सदर खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र.६ हा स्वतःच्या नावे फेर मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहे तसे झाल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.६ समाधान जयराम वानखेडे हा हजर होउन त्याचे लेखी म्हणणे दाखल करेपर्यंत वर नमुद खरेदीखताच्या आधारे स्वतःच्या नावे फेर मंजुर करु नये असा तुर्तातुर्त आदेश पारित करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. त्याअनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.६ समाधान जयराम वानखेडे व प्रतिवादी क्र.८ तलाठी मौजे लोणी यांना आदेशीत करण्यात येते की, गट क्र.२५४ मधील जमीनीसंदर्भात प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी दिनांक १०/०५/२०२३ रोजी दस्त क्र.२५६३ अन्वये १ हेक्टर ६० आर जमीनीबाबत प्रतिवादी क्र.६ च्या नावे फेर मंजुर करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी क्र.६ हा या दाव्यात हजर होउन त्याचे लेखी म्हणणे दाखल करेपर्यंत देण्यात येत आहे.

२. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ (अ) प्रमाणे पूर्तता करावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील तारीख ०५/०५/२०२५ ठेवण्यात येत आहे.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
ABDUL KARIM
ABDUL RAHIMAN
SHAIKH
Date: 2025.04.25
17:01:15 +0530

**(अ. अ. शेख)**

दिनांकः २५/०४/२०२५

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मेहकर.

# <u>प्रमाणपत्र</u>

| | |
|---|---|
| मी असे प्रमाणीत करतो की, या P.D.F. आदेश फाईलमधील मजकुर मुळ आदेशाच्या फाईलप्रमाणेच शब्दशः सारखा आहे. | |
| लघुलेखक ग्रेड २ यांचे नाव | बाळकृष्ण म. शीलवंत. |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मेहकर. |
| आदेश घोषीत दिनांक | २५/०४/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी आदेश स्वाक्षरी केल्याचा दिनांक | २५/०४/२०२५ |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | २५/०४/२०२५ |